बुधवार, दि २६ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २१ वा ● किंमत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# अन् संजीवनी हॉस्पीटल दिला चेक


## युवा आदर्शच्या बातमीचा परिणाम; योजनेत पैसे घेतल्यास तक्रार करण्याचे जिल्हा समन्वयक डॉ. सानप यांचे आवाहन

**दीपक शेळके**

**जालना** - संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये योजनेत 'स्पेशल' उपचार या मथळ्याखाली मंगळवार (दि २५) रोजी दैनिक युवा आदर्शने वृत्त प्रकाशित केल्यानंतर हॉस्पीटल प्रशासन टाळ्यावर आले आहे. अतिरिक्त पैसे घेतलेल्या रुग्णास प्रशासनाने कोटक बँकेचा २५ फेब्रुवारी २०२५ रोजीचा दहा हजार रुपयांचा चेक दिला आहे. चेक मिळाल्यानंतर रुग्ण व नातेवाईकांनी युवा आदर्श, हॉस्पीटल प्रशासनाचे तसेच योजनेचे जालना जिल्हा समन्वयक डॉ. सचिन सानप यांचे आभार व्यक्त केले.

महात्मा फुले जन आरोग्य योजना असो अथवा ईतर योजना रुग्णांकडून कोणतेही कारण दाखवून अतिरिक्त पैशाची मागणी करत असल्यास किंवा पैसे घेतले असल्यास याबाबत हॉस्पीटलमध्ये असलेले योजनेसाठीचे आरोग्य मित्र यांच्याकडे जिल्हा समन्वयक या नावावे तक्रार करण्याचे आवाहन डॉ. सचिन सानप यांनी केले आहे.

महात्मा फुले जन आरोग्य योजना अथवा इतर योजनेत रुग्ण असल्यास त्यास निव्वळ मोफत उपचार मिळणे अपेक्षित असते. असे असतांना योजना मंजुर झाल्यानंतरही 'स्पेशल' युक्ती वापरून चांगले स्ट्रेंथ, चांगले रॉड, चांगला बॉऊल, चांगले पॅनल आदी विविध उपचार पद्धतीतील साहित्य वापरण्यासाठी दर्जेदार साहित्य रुग्णांच्या भल्यासाठी चांगल्या आरोग्यासाठी वापरणे आवश्यक असल्याचे रुग्णांच्या नातेवाईकास पटवून देत त्यांच्याकडून अतिरिक्त पैसे उकळण्यात येतात यासंदर्भात युवा आदर्शने वृत्त प्रकाशित केले होते. तसेच संबंधीत रुग्णांच्या नातेवाईकाने रितसर तक्रार जिल्हा समन्वय डॉ. सचिन सानप यांच्याकडे केली होती. आरोग्य योजनेच्या प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली. व हॉस्पीटल प्रशासनाला विचारणा करत पैसे घेतले असल्यास परत करण्यासह खुलासा करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर हॉस्पीटल प्रशासनाने रुग्णांच्या नातेवाईकाशी संपर्क साधुन हॉस्पीटलमध्ये बोलावून घेत मंगळवार (दि २५) रोजी दहा हजार रुपयांचा चेक सुपूर्द केला. चेक मिळाल्यानंतर रुग्णांच्या नातेवाईकाने युवा आदर्श व हॉस्पीटल प्रशासनासह योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सानप यांचे आभार व्यक्त केले.



रुग्णांच्या नावाने अकाऊंट पे दिलेला संजीवनी हॉस्पीटलचा चेक


युवा आदर्श

संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये योजनेत 'स्पेशल' उपचार

---

# युवा आदर्श

## महादेव ...

त्रिगुणात्मक रूपदर्शे
त्री पर्णी रे बिल्वपत्री
प्रियतम शिव शंकरा
भाळली ती हिमपुत्री
देखणा कैलास राणा
बाहुबली सशक्त गात्री
पाहताना दिव्यकांती
अभिषेक धार ये नेत्री
बारा ज्योतिर्लिंग यात्रा
फिरवतोस सर्व क्षेत्री
प्रमाद सर्व घेई उदरी
देई प्रासाद कृपाछत्री
साधका सदैव पाठी
संकटात हीचं खात्री
दर्शन तव नीत घडो
शक्तिपीठ तिर्थ क्षेत्री
कुमारिका पुजा करे
नारी ही भाग्य दाती
स्त्री पुरुष भेद सरो
जुळून येई नव नाती
माझे तन तव स्थान
तुच शिव गात्रीगात्री
सत्कर्म नेहमी घडो
विनंतीतुज दिनरात्री

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत ४३६ कोटी नियतव्यय मंजूर

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ करीता जिल्ह्यांनी सादर केलेल्या प्रारुप आराखड्यांना मान्यता देण्यासाठी तसेच त्यास अंतिम स्वरुप देण्यसाठी उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय राज्यस्तरीय बैठकांचे आयोजन दि. ३ फेब्रुवारी, २०२५ ते ११ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. राज्यस्तरीय बैठकीमध्ये आपल्या जिल्ह्याकडून करण्यात आलेल्या सादरीकरणांनंतर जिल्हा योजनेचा नियतव्यय अंतिम करतांना, कार्यान्वीन यंत्रणांची मागणी, जिल्ह्याचे वैशिष्ट्य, गरजा तसेच शासनाची प्राथमिकता इ. बाबी विचारात घेऊन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२५ करीता जालना जिल्ह्यासाठी एकूण रुपये ४३६ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आला. सन २०२४-२५ करीता जिल्ह्यासाठी ३९० कोटी नियतव्य मंजूर झाला होता. सन २०२४-२५ करीता मंजूर नियतव्य अंतर्गत नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्यय रुपये २२.४१ कोटी रुपयांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच बदनापूर आणि परतूर या आकांक्षित दोन तालुक्याकरीता प्रत्येकी ५-५ कोटी नियतव्यय शासनाने अंतिमत: मंजूर केला असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

राज्यात गतीने होत असलेले नागरीकरण लक्षात घेवून सर्व जिल्ह्यांना नागरीकरणाच्या प्रमाणात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायती यांना विशेष अतिरिक्त नियतव्यय (डशिलळरश्र वव्ळींळेपरश्र ीश्रिू) उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता विचारात घेऊन, सन २०२५-२६ या वर्षाकरीता आपल्या जिल्ह्यास मंजूर रुपये ४३६ कोटी अंतिम नियतव्ययापैकी रुपये २२.४१ कोटी इतका नागरी भागासाठीचा विशेष अतिरिक्त नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. या विशेष अतिरिक्त नियतव्ययाचा वापर आपल्या जिल्ह्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जनगणना-२०११ च्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरी भागाच्या विकास कामांसाठी करण्यात येणार आहे.

निती आयोगाकडून जिल्ह्यातील पान २ वर

# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापनबाबत प्रशिक्षण व जनजागृतीपर कार्यक्रम महसूल भवन येथे पार पडला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे व सरिता सुत्रावे, तहसीलदार प्रणाली तायडे, मुंबई सेवाचे चिंतामणी कदम, अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे, १०८ रुग्णवाहिका समन्वयक मनोज जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रमुख दीपक काजेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यामध्ये प्राथमिक आगीपासुन बचाव व सुरक्षीतेकरीता रंगीत तालीम तसेच अग्निशामक यंत्राचा वापर कशाप्रकारे करावा याबाबत अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे यांनी मार्गदर्शन केले. तर सीपीआर अर्थात प्रथमोपचार कसा प्रकारे करावा याबाबत १०८ रुग्णवाहिका समन्वयक मनोज जाधव यांनी प्रात्यक्षिकासह सविस्तर माहिती दिली.

आपत्तीचे नैसर्गिक व मनुष्यनिर्मित आपत्ती असे दोन प्रकार पडतात. आग, पुरपरिस्थिती, रस्ते अपघात, दुष्काळ, भूकंप, साथीचा रोग, वीज पडणे आदि आपत्तीमध्ये करावयाच्या उपाययोजनांची माहिती पान २ वर

# उद्योजक गोविंद गोयल यांनी साधला राज्यपालांशी संवाद






**मुंबई** - महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते नुकतेच One Week for Nation या व्हिडिओचे अधिकृत लोकार्पण करण्यात आले. हा सोहळा मुंबई येथील राज भवनात पार पडला. यावेळी राजभवन येथे मान्यवर व्यक्तीं सोबत कालिका स्टीलचे संचालक गोविंद घनश्यामदास गोयल हे देखील उपस्थित होते. प्रसंगी श्री गोयल यांनी राज्यपालांशी संवाद साधला. ज्यांनी हा सोहळा घडून आणला त्या 'स्वयं टॉक्स' टीमचे गोविंद गोयल यांनी आभार मानले.

# संपादकीय

## गझल सम्राट

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्उउया उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पान १ वरुन

### जिल्हा वार्षिक ...

बदनापूर व परतूर हे तालुके आकांक्षित तालुके म्हणून घोषित करण्यात आले आहेत. आकांक्षित तालुक्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रति तालुका रुपये ५ कोटी याप्रमाणे रुपये १० कोटी इतका निधी एक विशेष बाब म्हणून देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

### आपत्ती व्यवस्थापन ...

देत अपघातग्रस्तांना कशाप्रकारे मदत पुरवावी तसेच प्रथमोपचार औषध पेटीमधील साहित्याचा वापर कशाप्रकारे करावा. अपघातग्रस्त व्यक्तींच्या हातावरील रक्तस्त्राव तसेच डोक्यावरील जखमेला कशाप्रकारे पट्टी बांधावी म्हणजे त्या व्यक्तीस दवाखान्यात दाखल करेपर्यंत आराम मिळेल आणि त्याचा जीव वाचू शकेल यासाठी सविस्तर माहिती मुंबई सेवाचे चिंतामणी कदम यांनी दिली. तसेच अतिघाई, काळजी तसेच जंकफुडपासून दूर राहण्याचा सल्लाही दिला. आपातकालीन परिस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्ष -१०७७, पोलिस नियंत्रण कक्ष-१००/११२, रुग्णवाहिका-१०८/१०२ आणि अग्निशामक दल-१०१ या क्रमांकावर त्वरीत संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# ट्रम्पच्या एकाकी निर्णयाने जगात अस्थिरतेचे वातावरण; यामुळे जगाची दैना अवस्था!

२० जानेवारी २०२५ रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यापासून त्यांनी केलेली विधाने व निर्णय पहाता त्यांचा मानसिक तोल ढासळला की काय असल्याचे मानले जाते. डोनाल्ड ट्रम्पच्या हातात अमेरिकेची सुत्रे येताच त्यांनी गेल्या एक महिन्यात असे निर्णय घेतले की जगातील अनेक देशांच्या भुवया उंचावल्या व चिंतेत पडले.त्यामुळे गेल्या महिन्याभरातील निर्णयाचा आढावा घेतला असता आगामी येणाऱ्या चार वर्षांचा कालखंड हा जगासाठी प्रचंड उलथापालथीचा आणि कलाटण्यांचा असणार आहे याचे स्पष्ट संकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत घेतलेल्या निर्णयांवरून स्पष्ट दिसून येते. डोनाल्ड ट्रम्प सत्तेत येताच जगातील संपूर्ण शेअय मार्केट धाराशाही झाले व सोन्याचे आभाळाला जाऊन टेकले.यामुळे उद्योग जगत सुध्दा ट्रम्पच्या निर्णयाने भरडल्याचे दिसून येते.अमेरिका सुपर पॉवर आहे ही बाब सत्य आहे यात दुमत नाही.परंतु ट्रम्प सरकार जे काही निर्णय घेत आहेत ते फक्त स्वतःच्या फायद्यांचे घेत असल्याचे दिसून येते. अमेरिका व्यापारी राष्ट्र आहे व जगातील एक महत्वपूर्ण देश असल्यामुळे त्यांनी संपूर्ण जगाचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यापासुन भारताला लक्ष्य बनविण्याचे धोरण सुरू केल्याचे दिसून येते. राजकीय शिष्टाचार मोडीत काढून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत त्यांनी केलेली विधाने पहाता ट्रम्प यांच्या मनात खरोखरच भारताबद्दल प्रेम व आदर आहे की नाही यावर सध्या प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.ट्रम्पच्या वागण्यावरून असे वाटते की भारताला अपमानित तर करत नाही ना!डोनाल्ड ट्रम्प यांच्या चुकीच्या निर्णयाची झळ भारतालाही सोसावी लागणार आहे.भारतात अमेरिकेन वस्तूंवर सरासरी २९ टक्के आयात शुल्क आकारले जाते.भारताच्या वस्तूंवर मात्र अमेरिका तेवढेच शुल्क आकारत नाही.यात वाहन उद्योग, औषध उद्योग, डेअरी उत्पादने,कृषीमाल यांसह सर्वच क्षेत्रात प्रचंड आयात शुल्क आकारले जात असल्याने अमेरिकन वस्तूंना भारतीय बाजारपेठेत वावच नाही.डोनाल्ड ट्रम्पचे तडकाफडकी निर्णय पहाता पंतप्रधान मोदींनी तत्काळ अमेरिका दौऱ्याची आखणी केली व ट्रम्प यांची भेट घेऊन त्यांना सांगण्यात आले की इतर देशांवर ज्याप्रमाणे आपण निर्बंध लावले आहेत.त्याप्रमाणे भारतावर एकतर्फी काही निर्बंध लावू नयेत म्हणजेच आयात शुल्क लावू नये हा प्रमुख उद्देश मोदींचा होता. ट्रम्पचे धोरण म्हणजे आपल्या वस्तू दुसऱ्या देशात कमी टेरिफमध्ये विकायच्या आणि त्या देशांच्या वस्तूंवर भरमसाठ शुल्क आकारायचे हा प्रकार दिर्घकाळ सुरू ठेवता येणार नाही असे अनेक देशांचे म्हणने आहे.सध्याच्या परिस्थितीत अमेरिका व्यापारी चाल खेळुन सौदेबाजी करतांना दीसत आहे.भारताच्या बाबतीत सांगायचं म्हणजे भारत-अमेरिका व्यापारातून तूट कमी करण्यासाठी ट्रम्प यांच्या कडून दोन प्रस्ताव मांडण्यात आले आहे. एक म्हणजे अमेरिकन तेल व एलएनजीची आयात भारताने वाढवावी आणि दुसरे म्हणजे अमेरिकन संरक्षण साधनसामुग्री व शस्त्रांची खरेदी करावी म्हणजेच अमेरिका व्यापार करतांना स्वतःच्या फायद्यांवर जास्त जोर देत असल्याचे दिसून येते.अमेरिका भारताला जेवढा चांगला म्हणतो तेवढाच वाईटही म्हणतो ही बाब ट्रम्पच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते.ट्रम्प म्हणतात की तत्कालीन बायडेन प्रशासनाने भारताला निवडणुकीत मदतीसाठी युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट अर्थात (यूएसएआयडी) ने १.८ कोटी अमेरिकी डॉलरचे अर्थसहाय्य दिले.या निधीची भारताला गरज नव्हती, असे विधान डोनाल्ड ट्रम्प यांनी दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ ला केले.सोबतच हेही म्हणाले की भारताने अमेरिकेचा फायदा घेतला असाही आरोप ट्रम्प यांनी भारतावर लावला.यावरून स्पष्ट होते की ट्रम्प केव्हा कोणता निर्णय घेईल हे सांगणे कठीण आहे.त्यामुळे भारतासह जगातील संपूर्ण देशांनी ट्रम्पपासुन सावध रहाने गरजेचे आहे.कारण स्वतःच्या स्वार्थासाठी तो केव्हाही कोणाचाही बळी घेवू शकतो याला नाकारता येत नाही.राष्ट्रपती ट्रम्प यांनी युक्रेन प्रकरणात युरोपला पुर्णपणे डावलले असल्याचे दिसून येते.वास्तविक युक्रेन हे युरोपचे प्रवेशद्वार मानले जाते.आज युक्रेन, उद्या पोलंड, नंतर हंगेरी या क्रमाने रशिया युरोपात घुसण्याची योजना आखत आहे.तरीही युरोपला आपल्यासोबत घेण्याची गरज ट्रम्प यांना वाटत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. यावरून स्पष्ट होते की ट्रम्पचे निर्णय जगासाठी व सोबतच अमेरिकेसाठी सुध्दा घातक सिध्द होऊ शकतात.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

# 'महाशिवरात्र' व्रताचे महत्त्व

शिव ही सहज प्रसन्न होणारी देवता असल्यामुळे शिवाचे भक्त पृथ्वीतलावर मोठ्या प्रमाणात आहेत. महाशिवरात्र हे शिवाचे व्रत असून या व्रताचे महत्त्व, व्रत करण्याची पद्धत आणि महाशिवरात्र व्रताचा विधी यांविषयीची शास्त्रीय माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून जाणून घेऊया.

तिथी - महाशिवरात्र हे व्रत माघ वद्य चतुर्दशी या तिथीला करतात.

देवता - महाशिवरात्र हे शिवाचे व्रत आहे.

महत्त्वः महाशिवरात्र या दिवशी शिवतत्त्व नेहमीपेक्षा १००० पटीने कार्यरत असते. शिवतत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यासाठी महाशिवरात्रीला शिवाची भावपूर्णरित्या पूजाअर्चा करण्यासह ' नमः शिवाय ।' हा नामजप जास्तीतजास्त करावा.

प्रकार : काम्य आणि नैमित्तिक.

महाशिवरात्र व्रत करण्याची पद्धत : उपवास, पूजा आणि जागरण ही महाशिवरात्र व्रताची तीन अंगे आहेत.

महाशिवरात्र व्रताचा विधी : माघ कृष्ण त्रयोदशीला एकभुक्त रहावे. चतुर्दशीच्या दिवशी सकाळी महाशिवरात्र व्रताचा संकल्प करावा. सायंकाळी नदीवर किंवा तळ्यावर जाऊन शास्त्रोक्त स्नान करावे. भस्म आणि रुद्राक्ष धारण करावे. प्रदोषकाळी शिवाच्या देवळात जावे. शिवाचे ध्यान करावे. मग षोडशोपचारे पूजा करावी. भवभवानीप्रीत्यर्थ तर्पण करावे. शिवाला एकशे आठ कमळे किंवा बेलाची पाने नाममंत्राने वाहावीत. मग पुष्पांजली अर्पण करून अर्घ्य द्यावे. पूजासमर्पण, स्तोत्रपाठ आणि मूलमंत्राचा जप झाल्यावर शिवाच्या मस्तकावरील एक फूल काढून ते स्वतःच्या मस्तकावर ठेवावे आणि क्षमायाचना करावी.

यामपूजा : शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्यात, असे विधान आहे. त्यांना 'यामपूजा' असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालावे, अनुलेपन करावे, तसेच धोत्रा, आंबा आणि बेल यांची पत्री वाहावी. तांदुळाच्या पिठाचे २६ दिवे करून त्यांनी देवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावेत. प्रत्येक पूजेतील मंत्र वेगवेगळे असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. नृत्य, गीत, कथा श्रवण इत्यादी गोष्टींनी जागरण करावे. पहाटे स्नान करून पुनश्च शिवपूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे. आशीर्वाद घेऊन व्रतसमाप्ती करावी. बारा, चौदा किंवा चोवीस वर्षे हे व्रत केल्यावर त्याचे उद्यापन करावे.'

शिवाने विश्रांती घेण्याची वेळ म्हणजे ऋमहाशिवरात्र'

भगवान शंकर रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. त्या प्रहराला, म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला महाशिवरात्र असे म्हणतात. पृथ्वीवरील एक वर्ष म्हणजे स्वर्गलोकातील एक दिवस. पृथ्वी जड (स्थूल) आहे. जडाची गती खूप कमी असते. म्हणजेच जडाला ब्रह्मांडात प्रवास करण्यास जास्त वेळ लागतो. देवता सूक्ष्म असल्याने त्यांची गती जास्त असते. त्यामुळे त्यांना ब्रह्मांडात प्रवास करण्यास कमी वेळ लागतो. यामुळेच पृथ्वी अन् देवता यांच्यामध्ये एक वर्षाचे अंतर आहे.

महाशिवरात्रीला उपासना केल्याने होणारा लाभ

भगवान शंकर रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. त्या प्रहराला, म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला ऋमहाशिवरात्र' असे म्हणतात. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाची उपासना करण्यामागील शास्त्र याप्रमाणे आहे. ऋशिवाच्या विश्रांतीच्या वेळी शिवतत्त्वाचे कार्य थांबते, म्हणजेच त्या वेळी शिव ध्यानावस्थेतून समाधी-अवस्थेमध्ये जातो. शिवाची समाधी-अवस्था म्हणजे शिवाने स्वत:साठी साधना करण्याचा काळ. त्यामुळे विश्वातील किंवा ब्रह्मांडातील तमोगुण किंवा हालाहल त्यावेळी शिवतत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे ब्रह्मांडामध्ये हालाहलाचे प्रमाण प्रचंड वाढते किंवा अनिष्ट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो. त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून जास्तीतजास्त शिवतत्त्व आकृष्ट करणारी बिल्वपत्रे, पांढरी फुले, रुद्राक्षांच्या माळा इत्यादी शिवपिंडीवर अर्पण करून वातावरणातील शिवतत्त्व आकृष्ट केले जाते. त्यामुळे अनिष्ट शक्तींच्या वाढलेल्या दाबाचा परिणाम आपल्याला म्हणावा तितका जाणवत नाही.'

महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाने ज्ञान देणे

ऋमहाशिवरात्रीच्या दिवशी शिव सर्व जिवांना आवर्जून मार्गदर्शन करतो. त्यामुळे अनेक जीव त्याच्याकडून मार्गदर्शन घेण्यासाठी त्या दिवशी शिवलोकात उपस्थित असतात.'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'शिव'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

### खरपुडी येथे सिडकोचा वादग्रस्त प्रकल्प शेतकऱ्यांचे नुकसान, आर्थिक हितसंबंध, आणि पारदर्शकतेचा अभाव;

# शेतकऱ्यांना योग्य मोबदला न मिळाल्यास प्रकल्प रद्द करण्याची मागणी करणार - खा. डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाने जालना जिल्ह्यात खरपुडी येथे सिडकोने नवीन प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असून, या संदर्भात मागील काही वर्षांत विविध प्रशासकीय आणि आर्थिक टप्प्यांवर निर्णय घेतले गेले आहेत. तथापि, या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.


सिडकोने जालन्यात प्रकल्प राबविण्यांचा निर्णय घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी त्याचे स्वागत केले. त्यानुषंगाने भुसंपादनाची कारवाई देखील सुरू केली. परंतु सुरूवातील भूसंपादन करतांना शेतकऱ्यांना दिलेला भाव - मावेजा जमिनीची जी किंमत दिली. तिच रक्कम उर्वरित भुसंपादनाला देण्याची भुमिका शेतकऱ्यांची आहे. ठराविक लोकांना वेगळा भाव दिला जात असुन, उर्वरित शेतकऱ्यांना वेगळा भाव देण्यांत येत आहे, ही बाब अतिशय गंभीर आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव न मिळाल्यास शेतकऱ्यांसमवेत आंदोलन उभारण्यांत येईल असे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी स्पष्ट केले.

सदर प्रकल्पाची संकल्पना सन २०१८ मध्ये सिडकोने मांडली होती. त्यानंतर ऐपीर्पी र्धीपस या आंतरराष्ट्रीय संस्थेची नियुक्ती करून प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यात आला. दिनांक १० जानेवारी २०२० रोजी प्रस्तुत केलेल्या अहवालात सदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर शासनाने दिनांक ९ जुलै २०२० रोजी हा प्रकल्प निरधिसूचित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, २०२२ आणि २०२३ मध्ये सिडको व शासनाकडून या प्रकल्पाच्या पुनरावलोकनास सुरुवात झाली आणि नवीन घझचऋ अहवालाच्या आधारे २०२४ मध्ये प्रकल्पास अंतिम मान्यता देण्यात आली.

पूर्वी अव्यवहार्य ठरलेला प्रकल्प काही वर्षांतच व्यवहार्य कसा काय ठरतो? नवीन आणि जुन्या अहवालांमध्ये काय तफावत आहे? हे शासनाने पारदर्शकपणे स्पष्ट करणे गरजेचे होते, परंतु त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे. तसेच, या प्रकल्पाच्या मंजुरीपूर्वीच काही व्यावसायिकांना संबंधित अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय माहिती देण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या व्यावसायिकांनी शेतकऱ्यांकडून अत्यल्प दराने जमीन विकत घेऊन त्या जमिनींचे नंतर निवासी क्षेत्रात रूपांतर करण्यात आले. परिणामी, मूळ शेतकरी व भूधारक आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत.

याशिवाय, या प्रकल्पाच्या मंजुरी प्रक्रियेत अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या आहेत. आधीच अव्यवहार्य ठरलेल्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी निधी खर्च करणे योग्य नाही. हा निधी इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी वापरणे अधिक हिताचे ठरेल.

स्थानिक शेतकऱ्यांनी अगोदरच्या भुसंपादनाला दिलेला भाव मिळाला नाही तर या प्रकल्पास तीव्र विरोध दर्शविला आहे. आमची जमीन डीनोटीफाईड करा असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यामध्ये काही अधिकारी आणि व्यावसायिकांचे



आर्थिक हितसंबंध असल्याने हा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

सदर प्रकल्पासाठी २४७ हेक्टर जमीन संपादित करायची असून, त्यामध्ये ५० गटांचा समावेश आहे. आतापर्यंत २० गटांतील ११९ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करून दर निश्चित करण्यात आले आहेत. उर्वरित ३० गटांपैकी १६ गटांची मोजणी अंतिम टप्प्यात असून, १४ गटांची मोजणी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

या पार्श्वभूमीवर, सदर प्रकल्पाच्या मंजुरीसंदर्भात घेतलेल्या निर्णयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यांत यावी. तसेच, शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## नवीन विधिज्ञांना विविध विभागात समाविष्ट करून स्टायपेंड देण्यात यावा - ॲड. धन्नावत

### मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली मागणी



**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये नवीन विधिज्ञांना संधी उपलब्ध करून देत त्यांना शासकीय स्तरावर स्टायपेंड देण्यात यावा, अशी मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे.

यासंदर्भात ॲड. महेश धन्नावत यांनी सोमवार दि. २४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाचे विविध शंभरपेक्षा जास्त विभाग असून, त्या प्रत्येक विभागात कायदातज्ञांची गरज आहे. त्याचप्रमाणे शासनातर्फे लोक अभिरक्षक विभाग तथा जिल्हा सरकारी अभियोक्ता यांच्या अखत्यारित त्यांच्या हाताखाली नविन विधिज्ञांना कमीत-कमी एक ते दोन वर्ष अनुभव देण्यात यावा आणि स्टायपेंड बेसेसवर संधी देण्यात यावी. जेणेकरुन नवीन पदवी प्राप्त विधिज्ञांना काम करण्याची संधी मिळेल व अनुभव प्राप्त होईल. कायदेशीर बाबीची पुर्तता होण्यास मदत होऊन न्यायालयीन प्रकरण कमी वेळेत निकाली निघण्यास वाव मिळेल. शिवाय कमी होण्यास मदत होईल. स्टायपेंडमुळे ते त्यांच्या पायावर उभे राहतील. ही बाब विचारात घेता नवोदित विधिज्ञांना न्यायालयीन प्रक्रियेत अनुभव मिळावा आणि त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे, यासाठी शासकीय न्याय विभाग तसेच जिल्हा सरकारी अभियोक्ता यांच्याकडे सामावून घेऊन मासिक मानधन दिले जावे. नवीन विधिज्ञांना अशा स्वरूपात आर्थिक मदत मिळाल्यास त्यांना न्यायव्यवस्थेतील बारकावे शिकण्याची संधी मिळेल आणि भविष्यात अधिक सक्षम वकील तयार होतील, असे मत धन्नावत यांनी व्यक्त करून, शासनाने या मागणीवर सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घ्यावा, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी निवेदन देताना त्यांच्यासमवेत विविध वकिलांची उपस्थिती होती.

## इंद्रजीत वरकड यांना पीएचडी प्रदान

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील माळतोंडी येथील इंद्रजीत राजेभाऊ वरकड यांना विज्ञाननातील रसायनशास्त्र या विषयात पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. मुंबई येथील रासायनिक तंत्रज्ञान संस्था यांच्याद्वारे ही पीचडीची पदवी त्यांना देण्यात आली आहे. त्यांनी पीचडीची ही पदवी जालना येथील रासायनिक तंत्रज्ञान संस्था मराठवाडा परिसर जालना येथे पुर्ण केली. त्यांनी आपल्या मेहनतीने आणि चिकाटीने रसायनशास्त्र विषयात पीएचडी प्राप्त करून एक मोठे यश संपादन केले आहे. त्यांच्या यशामागे असलेल्या कुटुंबीयांच्या, गुरुजनांच्या आणि मित्रमंडळींच्या योगदानाचाही त्यांनी आदरपूर्वक उल्लेख केला आहे, ही कौतुकास्पद गोष्ट आहे. त्यांच्या या यशाबद्दल मित्र मंडळी, व गावकऱ्यांच्या त्यांचे वतीने सत्कार करण्यात आले आहे.










# प्रधानमंत्री आवास योजनेसाठी नोंदणी करा

## उपनगराध्यक्षा छायाताई वाघमारे यांचे आवाहन

**मंठा । प्रतिनिधी -** प्रधानमंत्री आवास योजनेची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली असून नगर पंचायत शहरी भागातील सर्व नागरीकांनी प्रधानमंत्री आवास योजना शहरी भागा करिता २.0 बी एल.सी अंतर्गत नवीन घरकुल मंजुरी करीता या वेब पोर्टल (https:pmaymis.in PM-YMUS2024/Pmay Default.aspx) वर इच्छुक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन मंठा नगर पंचायत च्या उपनगराध्यक्षा सौ छाया अरुण वाघमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. ऑनलाइन नोंदणीकरिता घराचे बांधकाम करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा असावी. कुटुंबाच्या कोणत्याही सदस्याच्या नावाने देशात कोणत्याही भागात पक्के घर नसावे अर्जदाराने पुढील प्रमाणे अर्ज करावे. यात अर्जदाराचे २ आयडी साईझ फोटो, अर्जदार मोबाईल क्रमांक (आधार लिंक असलेला), अर्जदार व कुटूंबातील सर्वांचे आधार कार्ड (आधार क्रमांक, नाव, जन्मतारीख, अर्जदाराचे आधार लिंक असलेले सक्रिय बैंक खाते (खाते क्रमांक, बैंक नाव, आय एफ सी कोड, अर्जदार कुटूंबाचा उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, जमीन दस्तऐवजी (प्लॉट मालकी ७/१२ उतारा/८ अ किवा सिटी सर्वे उतारा चालू ३ महिन्यातील, खरेदी दस्त (खरेदी दस्त नसेल तर फेरफार, मंठा नगर पंचायत ८ अ उतारा व देणे बाकी नसलेचा दाखला, रेशनकार्ड, प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, अर्जदार यांचे आई व वडिलांचे कुटुंबातील सर्वच आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र, पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी. एम. विश्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत आवश्य जोडावी व सदरील योजनेचा लाभजास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आव्हान छायाताई वाघमारे दिलेल्या



पत्रकात म्हटले आहे. घर नसावे इतर कोणत्याही शासकीय घरकूल योजनेचा लाभ मागील २० वर्षात घेतलेला नसावा.३) अर्जदार हा आर्थिकदृष्टया मागास घटकातील असावा. (अर्जदार उत्पन्न ३ लाख पर्यंत दाखला आवश्यक आहे.) अर्जदाराचे स्वःच्या नावाने आधार लिंक असलेले बैंक खाते असावे. ५) जात प्रमाणपत्र एस सी, एस टी,ओबीसी साठी आवश्यक आहे.

जास्तीत जास्त नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# नाशिक येथे राज्यस्तरीय धम्म परिषदेला उपस्थित राहा - साबळे

**मंठा । प्रतिनिधी -** येत्या २ मार्च रोजी नाशिक येथील हुतात्मा अनंत कान्हेरे गोल्फ क्लब मैदानात संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय बौद्ध धम्म परिषदेस बौद्ध समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आसाराम साबळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. याबाबतीत सविस्तर वृत्त असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह दिनाचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बौद्ध भिक्षू दलाई लामा व देश - विदेशातील प्रख्यात बौद्ध भिख्खू यांच्या उपस्थित बौद्ध धम्म परिषद व जाहीर धम्म सभेचे आयोजन करण्यात आलेले असून या धम्मसभेस अनेक मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक नामदार रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या या भव्य धम्म सभेस राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच अजित पवार



यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे संयोजक अध्यक्ष प्रकाश लोंढे यांच्या पुढाकाराने या भव्य धम्म सभेचे आयोजन करण्यात आलेले असून भंते सुगत थेरो हे या आयोजन समितीचे सरचिटणीस असणार आहेत. या धम्म परिषदेला बौद्ध समाज बांधवांनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन ॲडव्होकेट ब्रह्मानंद चव्हाण, अंकुशराव चव्हाण, आसाराम साबळे, गौतम वाव्हळ, अरुण जाधव, अच्युत साबळे, डॉ. प्रकाश साबळे, सामाजिक कार्यकर्ते माणिक साबळे, अशोक हिवाळे, छगन खरात, पुंजाराम साबळे, रमेश निकाळजे यांनी केले आहे.

# बारा ज्योतिर्लिंगांची आध्यात्मिक रहस्ये

ज्योतिर्लिंग म्हणजे ज्योति अर्थात प्रकाशस्वरूप चिन्ह (लिंग अर्थात चिन्ह), पिढ्यानपिढ्या अत्यंत श्रद्धेने आणि भक्तिभावाने या शिवलिंगांची पूजा केली जाते. ज्योतिर्लिंग हे निराकार परमात्म्याचे प्रतीक आहे. या १२ ज्योतिर्लिंगाची विशिष्ट नावे का आहेत? त्यांच्याशी निगडित काय कथा आहेत? आणि त्यामागे काही विशेष रहस्य आहे का, हे या शिवरात्रीच्या निमित्ताने जाणून घेऊ या.

**- सौ. कल्पना सुनील लाहोटी, (माजी नगराध्यक्ष, जालना)**

सोमनाथ : गुजराथेतील सौराष्ट्र येथे समुद्राजवळ प्राचीन सोमनाथ ज्योतिर्लिंग आहे. सोम म्हणजे चंद्र. असे म्हटले जाते, की येथे ज्योतिर्मय परमात्म्याकडून चंद्राला तेज प्राप्त झाले. ज्ञानसूर्य परमात्म्याकडून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाच्या प्रकाशाने अज्ञानरूपी अंधकार दूर होतो. सोम या शब्दाचा दुसरा अर्थ आहे अमृत. अज्ञानाने ग्रासलेल्या, दुर्बल झालेल्या जनसामान्यांना पुन्हा बलशाली करणारे परमात्म ज्ञान हे अमृतासमान आहे.

मल्लिकार्जुन : आंध्र प्रदेशातील श्रीशैलम् या पर्वतावर स्थित मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग मंदिर. मल्लिका या शब्दाचा एक अर्थ आहे शुभ्र रंगाचे अति सुगंधित पुष्प. ज्योतिर्लिंग रूपात पूजिले जाणाऱ्या सच्चीदानंद परमात्मा शिवाचे अति सुंदर ज्योतीबिंदू स्वरूप आहे. सत्यम शिवम सुंदरम आहे. हेच दिव्य आकर्षक स्वरूप श्री क्षेत्र मल्लिकार्जुन म्हणून प्रसिद्ध आहे.


महाकालेश्वर : मध्य प्रदेशातील ऐतिहासिक उज्जैननगरीमध्ये स्थित आहे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग. परमात्मा शिवाला 'महाकाल' संबोधले जाते. परमात्मा जन्म-मृत्यूच्या चक्रात येत नाही. या मृत्युलोकात प्रत्येक मनुष्याला योग्य वेळी नश्वर देहाचा त्याग करावा लागतो. परंतु शिव परमात्म्याचे अजर अमर अविनाशी सत्य स्वरूप जाणल्यानंतर मनुष्य अकाली मृत्यूच्या भयातून मुक्त होतो. म्हणून महाकालेश्वर हे ज्योतिबिंदू शिव परमात्म्याद्वारे मनुष्याला प्राप्त होणाऱ्या आत्मिक ज्ञानाचे प्रतीक आहे.

ओंकारेश्वर : ओम् चा अर्थ आहे- मी ज्योतिबिंदू आत्मा आहे. सर्व आत्म्यांचा पिता परमात्मा शिव हा देखील अखंड ज्योतिस्वरूप आहे. मात्र, ज्योतिर्लिंगाप्रमाणे मोठा आकार नसून तो बिंदुस्वरूप आहे. केवळ बिंदूची पूजा करण्यास कठीण असल्याकारणाने शिवलिंगाच्या रूपात त्याचे पूजन केले जाते. कलियुगाच्या या अंतिम चरणामध्ये अवतरित होऊन परमात्मा '' अर्थात आत्मिक रूपाचे सत्य ज्ञान मनुष्यास देतो. याचेच स्मृतिचिन्ह म्हणजे ओंकारेश्वर मंदिर आहे. तिथेच स्थित असलेले अमलेश्वर हे मनुष्य आत्म्यांना निर्मल (पवित्र) करणाऱ्या परमात्मा शिवाचे मंदिर आहे. निर्मल अर्थात पापविरहित. निराकार परमात्म्याशी मन आणि बुद्धीच्या एकाग्रतेद्वारे जोडले गेल्यास पापक्षालन होते.

वैद्यनाथ (वैजनाथ) : महाराष्ट्रात परळीजवळ स्थित असलेले प्राचीन ज्योतिर्लिंग बैद्यनाथ. एखाद्या असाध्य रोगाने ग्रस्त व्यक्तीवर इलाज करताना ज्यावेळी सारे उपाय हरतात; त्यावेळी स्वाभाविकच वैद्यांचा वैद्य परमात्म्याचे स्मरण होते. रोगाचे मूळ कारण हे वास्तविक पूर्वकमचि फळ असून या दुःखातून, या पीडेतून खऱ्या अर्थाने मुक्ती एक परमात्माच देऊ शकतो. परमात्मा शिव अवतरित होऊन ज्यावेळी ज्ञान आणि सहज राजयोगाचा उपाय सांगतात, त्यावेळी केवळ शारीरिक नव्हे, तर आत्म्याच्या अंतरंगात लपलेल्या काम-क्रोधादि विषय-विकार रुपी विषापासून मुक्ती तसेच जीवनमुक्ती प्राप्त होते. म्हणूनच शिवाला अमृतेश्वर अथवा नीळकंठेश्वर असेही संबोधले जाते.

भीमाशंकर : शास्त्रात असलेल्या वर्णनानुसार अशी कथा आहे, की भीमाशंकर या स्थानावर त्रिपुरासुर नामक राक्षसाला परमात्मा शिवाने आपल्या शक्तीने पराभूत केले तेव्हापासून हे स्थान दुष्ट शक्तींवरील विजयाचे प्रतीक ठरले. कलियुगाच्या अंतिम चरणांत ज्यावेळी मनुष्यात आसुरी प्रवृत्ती प्रबळ झाल्या आहेत, अशा धर्मग्लानीच्या युगात परमात्मा शिवाचे दिव्य अवतरण होते. त्याने दिलेल्या दिव्य ज्ञानामुळे मनुष्याची आत्मिक शक्ती पुन्हा जागृत होऊन पवित्रता, सुख, शांती सारख्या दिव्य गुणांची पुन्हा प्राप्ती होते. याच घटनेचे प्रतीकात्मक रूप ही असुर-वधाची कथा प्रसिद्ध आहे.

रामेश्वर : तामिळनाडूमध्ये समुद्र तटाजवळ प्रभू श्रीरामाने रामेश्वर ज्योतिर्लिंगाची प्रतिष्ठापनाकेली असे मानले जाते. असे म्हणतात, की रावणावर विजय प्राप्त करण्यासाठी युद्धापूर्वी श्रीरामाने परमात्मा शिवाचे स्मरण करून त्याच्याकडून वरदान प्राप्त करून घेतले. यावरून हे सिद्ध होते, की शिव परमात्मा केवळ साधारण मनुष्यांचेच नव्हे, तर देवताचेही पूज्य परमपिता आहेत. अर्थात्, कोणतीही शरीरधारी देवता परमात्मा नसून, परमात्मा हा निराकार ज्योतिबिंदु आहे. हे ज्योतिर्लिंग



सर्व आत्म्यांच्या ठायी परमात्म्याप्रती असलेल्या अगाध भक्तीचे प्रतीक आहे.

नागेश्वर/नागनाथ : महाराष्ट्रात स्थित असलेल्या या प्राचीन मंदिराचा उल्लेख शिवपुराणात देखील आढळतो, बहुतेक सर्वच शिवमंदिरांमध्ये शिवलिंगावर पंचमुखी नाग पाहावयास मिळतो. वास्तविक पाहता सर्प हा मानवी जीवनात विषाप्रमाणे पसरलेल्या पांच विकारांचे प्रतीक आहे. परमधाम निवासी शिव परमात्मा आपल्याला शक्ती प्रदान करून या विकारावर संपूर्ण विजय प्राप्त करवतात. म्हणून त्यांना नागेश्वर / नागनाथ असे संबोधले आहे.

विश्वेश्वर : इतिहासप्रसिद्ध वाराणसी नगरात गंगातटावर स्थित आहे श्री काशी विश्वनाथ मंदिर. त्रिमूर्ती शिव परमात्मा अखिल विश्वातल्या सर्व मनुष्य आत्म्यांचा पारलौकिक पिता आहे. सर्वधर्मीय लोक परमात्म्याला निराकार मानतात. पाच तत्वांपलीकडे दिव्य प्रकाश लोकात, परमधामात निवास करणाऱ्या शिव परमात्म्याच्या विश्वकल्याणकारी कर्तव्यांचे प्रतीक आहे श्री काशी विश्वेश्वर ज्योतिर्लिंग.

त्र्यंबकेश्वर : नाशिकजवळ गोदावरी नदीच्या किनाऱ्याजवळील प्राचीन देवस्थान त्र्यंबकेश्वर. त्र्यंबक अथवा त्रिंबक म्हणजे तिसरा नेत्र. चर्मचक्षुद्वारे ज्या गोष्टी पाहता येत नाहीत, त्या दिव्य बुद्धीच्या नेत्रांनी पाहणे शक्य आहे. शिव परमात्म्याचे या पृथ्वीवर दिव्य अवतरण होऊन त्यांच्या दिव्य ज्ञानाच्या प्राप्तीने मनुष्याची दिव्य बुद्धी विकसित होऊ लागते. अर्थात त्याला दिव्य बुद्धिरूपी तिसरा नेत्र प्राप्त होतो. ही प्राप्ती करवणाऱ्या परमात्म्याची स्मृती म्हणजे त्र्यंबकेश्वर. याखेरीज सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय (स्थापना, पालन आणि विनाश) या परमात्मा शिवाच्या तीन कर्तव्यांचेही प्रतीक म्हणजे त्र्यंबकेश्वर.

केदारेश्वर : बर्फाच्छादित हिमशिखरांमध्ये वसलेले अतिप्राचीन केदारनाथ मंदिर. १२ ज्योतिर्लिंगांतही या मंदिराचे महत्व विशेष आहे. अत्युच्च शिखरांबर स्थित असे हे मंदिर परमात्मा शिबाचे निवासस्थान अर्थात् पाच तत्वांच्या पलीकडे असलेल्या ब्रह्मलोक अर्थात् परमधामाचे स्मरण करून देते. यामागचे आणखी एक रहस्य म्हणजे ज्याप्रकारे हिमालयात प्रवास करत चढून गेल्यानंतरच केदारनाथाचे दर्शन होते, त्याचप्रकारे, उच्च श्रेष्ठ संकल्प आणि मनाची शांत आणि शीतल स्थिती असेल तरच सर्वश्रेष्ठ परमात्म्याचे मंगल मिलन होऊ शकते.

घृष्णेश्वर : एका प्रचलित कथेनुसार, पार्वतीने कुमकुम, केशर आणि शिवालयातील पवित्र जल हातात घेऊन घर्षण केले, त्या घर्षणातून या ज्योतिर्लिंगाची निर्मिती झाली आणि त्यातून दिव्य ज्योतिस्वरूप प्रकट झाले. ज्ञानसागर परमात्म्याचे ज्ञान प्राप्त झाल्यावर जर त्या ज्ञानाचे मनन, चिंतन केले, तर या ज्ञान घर्षणातून मनुष्याच्या बुद्धिचे तेज वाढू लागते. जड़ वस्तु-विकारांमध्ये रममाण होऊन मलिन झालेली बुद्धी दिव्य होऊ लागते. हा या प्रतीकात्मक कथेमागचा खरा अर्थ आहे.

या बारा ज्योतिर्लिंगाचे स्मरण सकाळ संध्याकाळ अर्थात सर्वदा करावे, त्यांच्या स्मरणाने अनेक जन्मांतरीची पापकर्म नष्ट होतात, तसेच या जन्मातही पापकर्मापासून परावृत्त होण्याची शक्ती मिळते. परमात्मा शिवाची १२ ज्योतिर्लिंग स्मरण करण्याचेही विशेष महत्त्व आहे. उत्तर भारतात फाल्गुन महिन्यात महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी केली जाते. दक्षिण भारतात माघ महिन्यातील कृ. १३ ही तिथी म्हणजे उत्तर. भारतातील फाल्गुन महिन्यात येणारी महाशिवरात्र. तिथीतील हा फारक पंचांगातील कालगणनेच्या पद्धतीमुळे उद्भवतो एवढेच. महाशिवरात्रीच्या वेळी परमात्मा शिव अवतरित झाले, अशी समजूत आहे. ही केवळ स्थूल दिवस-रात्रीची कथा आहे, की यात काही विशेष आध्यात्मिक अर्थ आहे ही रात्र आहे? ही रात्र आहे अज्ञानाची रात्र. स्वतःच्या आत्मिक रुपाचा यथार्थ परिचय नसल्यामुळे मनुष्य काम-क्रोध-लाभ-मोह-अहंकार या पाच विकारांच्या प्रभावाखाली कर्म करत आहे. या विकारवश केलेल्या कर्मामुळे दुःख प्राप्त होत आहे आणि या दुःख चक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही. अशा अज्ञानरूपी अंधकारात चाचपडत असलेल्या मनुष्यात्म्यांना सत्य ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले आहे. स्थूल ज्योतिर्लिंगाच्या रूपात ज्याची मनोभावे पूजा केली, त्याच भक्तीचे फलित म्हणून परमात्मा शिव दिव्य ज्ञान आणि सुख, शांती, पवित्रतेचे दान देत आहे. परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे स्मरण हाच दुःखमुक्तीचा मार्ग आहे.